शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे अखत्यारीत असलेले शासनमान्य कौशल्य आधारित पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.

(एशियन ॲकॅडमी ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च संस्थेचे एशियन कॉलेज ऑफ फार्मसी , पुणे)

## महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्र.– E-1774582 -HTED-14025 /47/2026-MHT(TE-5)**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : - १७ ऑगस्ट , २०२६

**वाचा :**

१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक मान्यता-२०२१/(प्र.क्र.११/१२१/तांशि-५, दिनांक : ०३.०५.२०२१.

२) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, अधिसूचना क्र.मरातंशिम/का-५४९(ब)/अ.मु.अ/ २०२६/९५४, दि.१३.०३.२०२६.

३) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे जा.क्र.मरातंशिमं/का-५४ब/अ.मु.अ./ २०२६-२७/२२१३, दि.३०.०६.२०२६ व दि.२३.०७.२०२६

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे अखत्यारीत असलेले अल्प मुदतीचे कौशल्य आधारित व्यवसायाभिमुख पदविका अभ्यासक्रमांना मान्यता देणेबाबतची कार्यपध्दती उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ०३.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने दिनांक १३.०३.२०२६ रोजी अधिसूचना प्रसिध्द करुन राज्यातील इच्छुक संस्थांकडून ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविले होते.

२. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडे प्राप्त झालेले अर्ज व अर्जासोबतच्या मुळ कागदपत्रांची कागदपत्र पडताळणी समितीमार्फत तपासणी तसेच पात्र संस्थेतील पायाभूत सुविधांची भौतिक पडताळणी तज्ञ समितीद्वारे करण्यात आली. तद्नंतर राज्यस्तरीय समितीने विभागस्तरीय समितीच्या अहवालांची पडताळणी करुन ज्या संस्थांमध्ये शैक्षणिक व पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत तसेच विहीत

निकषांची व त्यास पूरक आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करीत असलेल्या संस्थांच्या प्रस्तावाबाबत संदर्भाधिन पत्र क्र.३ अन्वये शासनास शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन सदर प्रस्तावांना शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून एशियन ॲकॅडमी ऑफ एज्युकेशन ॲंड रिसर्च संस्थेचे एशियन कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे अखत्यारीत असलेल्या शासनमान्य कौशल्य आधारित पदविका अभ्यासक्रमांसाठी सोबतच्या प्रपत्रात नमुद केल्यानुसार संलग्नित शैक्षणिक संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती -**

१. मंडळाच्या अखत्यारीतील शासनमान्य कोशल्य आधारित अभ्यासक्रमांना देण्यात येणारी मंजूरी ही शासनाच्या दि. २१.०५.१९८३ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कायम विना अनुदान तत्वावर असून सदर अभ्यासक्रमांना शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान देय असणार नाही.

२. सदर अभ्यासक्रमांचा कालावधी, प्रवेशक्षमता, सत्रपध्दत इ. बाबी शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टांमध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

४. सदर कौशल्य आधारित अभ्यासक्रमासाठी संस्थांनी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे. तसेच या शासन निर्णयाद्वारे मंजूरी प्राप्त अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राबविण्याचे ठरविल्यास सदर अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता घेणे संस्थांवर बंधनकारक राहिल.

५. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाचे फी प्रतिपूर्तीचे जरी धोरण असले तरी, त्यामध्ये कोणत्याही अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांना फी प्रतिपूर्ती योजना लागू नाही. त्यामुळे वरील अभ्यासक्रमाकरीता फी प्रतिपूर्ती योजना कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. आर्थिकदृष्टया मागास असलेल्या विद्यार्थ्यांना देखील फी प्रतिपूर्ती/सवलत योजना लागू होणार नाही.

६. शासनाने विहित केलेल्या तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे विहित नमुन्यातील रुपये पाचशेच्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र मंडळास सादर करणे संस्थांना बंधनकारक राहील.

७. संबंधित संस्थेने संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडे आवश्यक ती मुदतठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

८. सदर संस्थेने नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नियुक्ती, यंत्रसामुग्री व अद्यावत प्रयोगशाळा आणि मानकांप्रमाणे ग्रंथालय सुविधा विद्यार्थ्यांना देत असल्याबाबत शपथपत्र संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी घ्यावे. याबाबींची पूर्तता करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उप सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय यांची राहील.

९. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

१०. सदर संस्था संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या नियंत्रणाखाली राहील व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून घेतल्या जातील.

११. सदर अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचे प्रवेश गुणवत्ता, आरक्षण इत्यादी बाबतच्या शासकीय धोरणानुसार मंडळाच्या नियंत्रणाखाली करण्यात यावे.

१२. सदर शासन निर्णयांन्वये मान्यता मिळालेला अभ्यासक्रम संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून सुरू करणे आवश्यक राहील. संस्थेने सदर अभ्यासक्रम त्याप्रमाणे सुरू न केल्यास संस्थेला सदर अभ्यासक्रमाकरीता देण्यात आलेली मान्यता आपोआप रद्द होईल.

१३.शासन मान्यता व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता मिळाल्याशिवाय कोणत्याही संस्थेने विद्यार्थ्यांचे प्रवेश करु नयेत. मान्यता / संलग्नता मिळाल्याखेरीज विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास त्यास संपूर्णत: संस्था जबाबदार राहील.

१४.शासनाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संस्थांनी आकारल्यास संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

१५. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१६. याशिवाय संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थांना लागू राहतील.

१७. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नवीन अटी व शर्ती अंतर्भूत करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१७१९०११६०७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJAY VITTHAL KHARDE

Digitally signed by AJAY VITTHAL KHARDE
DN: CN = AJAY VITTHAL KHARDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HTED
Date: 2026.08.17 19:02:53 +05'30'

**(अजय वि. खर्डे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई,
३. सर्व उप सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालये (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत),
४. संबंधित संस्था (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत),
५. निवड नस्ती/तांशि-५

| शासन निर्णय क्र.1774582/ HTED-14025/47/2026-MHT(TE-5) दि. 17. 08. 2026 | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ANNEXURE - A** | | | | | | | | | |
| **List of Short Term Courses With It's Intake In New & Existing Institutes Proposed for approval by Government of Maharashtra From Academic Year 2026-2027** | | | | | | | | | |
| **Sr.No** | **Institute Code** | **Trust Name & Address** | **Institute Name & Address** | **Institute Region** | **Name of Course(s)** | **Intake** | **Duration of Course in years** | **Yearly/Semester pattern** | **Course Type** |
| 1 | 22466 | ASIAN ACADEMY OF EDUCATION AND RESEARCH, PUNE ,692/1+2, DECISION TOWER, OFFICE NO.10,BIBEWADI, PUNE-37 | ASIAN COLLEGE OF PHARMACY,PUNE ,SR. NO 28/15/16/31, DHAYARI road, PARI COMPANY CHOWK, DHAYARI, PUNE 411041 | Pune | IT-Advanced Diploma in Industrial Safety | 40 | 1 | Semester | Full Time |
| | | | | | LX-Advanced Diploma in Medical Laboratory Technology. | 60 | 1.5 | Semester | Full Time |

AJAY VITTHAL KHARDE

Digitally signed by AJAY VITTHAL KHARDE
DN: CN = AJAY VITTHAL KHARDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HTED
Date: 2026.08.17 19:03:01 +05'30'